International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना :– ग्रामीण महीलांचा विकास

**डॉ. राजू के. माटे**
जोतिराव फुले समाजकार्य माहाविद्यालय उमरेड जि. नागपूर
*Corresponding Author-* **डॉ. राजू के. माटे**
Email- rajumate273@gmail.com
DOI-10.5281/zenodo.7070738

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची ऐतिहासिक पार्श्वभुमी :–**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना हा कार्यक्रम केंद्र शासनामार्फत महिला व बाल विकास मंत्रालया व्दारे कार्यान्वित असणारा सर्वात मोठा आणि बहुउद्देशीय कार्यक्रम आहे. आयसिडिएस योजना हि २ ऑक्टोबर १९७५ पासुन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १०६ व्या जंयती दिनापासून सुरू करण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने मार्फत प्रारंभीक बाल्यावस्थेतील काळजी व विकासाकरीता एक वेगळा कार्यक्रम आहे. या योजनेमार्फत मागास, ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रात राहणाऱ्या सहा वर्षाहुन कमी वय असलेल्या बालकांच्या विकासासाठी व गर्भवती, स्तनदा माता आणि किशोरीसांठी एकत्रित सेवा अंगणवाडी केंद्रामार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. आय.सि.डि.एस. कार्यक्रमाअंतर्गत समुदायातील बालकांची काळजी, शारीरिक व मानसिक विकास तसेच सर्वांचे आरोग्य व पोषण या संबंधाप्रती गरजा, अंगणवाडी केंद्रात पूर्ण केल्या जातात. तसेच वरील गरजा हया एकमेकावर परस्परपुरक आहेत. एकात्मीत बाल विकास सेवा योजना हा कार्यक्रम समाजावर आधारित कार्यक्रम आहे. समुदायात कार्यक्रमांची अमंलबजावणी करतांना समुदायतील सदस्यांचे सहकार्य पंचायत स्तरावर व कार्यक्रमाचे नियोजन, महिला मंडळाचे, युवक मंडळाचे सहकार्य, धार्मिक संस्था, पदाधिकारी/स्थानिक नेता, स्वयंसेवी संस्था, प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि समुदायातील सक्रिय बचत गट, महिला इत्यादीचे योगदान घेणे आवश्यक आहे.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळातील विविध सर्वेक्षणामधून असे निदर्शनास आले की, शालेय पूर्व मुलांचे कुपोषण, बालमृत्यू बालकांमध्ये 'अ' जीवन सत्वांचा अभाव तसेच विविध बालरोग इत्यादीमुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर तसेच बौध्दिक क्षमतेच्या विकासावर प्रतिकुल परिणाम होतांना निदर्शनास आले. आहार खाण्यापिण्यातील अनियमितता व असमाधानकारक सवयी इत्यादी अन्नपदार्थ खातांना काय / खावे / काय / खाऊ नये इत्यादीची निवड, अन्न तयार करतांना पध्दतीचा उपयोग तसेच बाळाचे, आईच्या अंगावरील दुध तोडण्याची पध्दत, त्यानंतर बाळाला आहार व आरोग्य तसेच स्वच्छताविषयक अज्ञाणतामुळे / महिलांना अनेक आजार होतात. समुदायातील मंत्रतंत्र, उपचारावरील लोकांचा विश्वास, भुतप्रेत, अंधश्रध्दा इत्यादींमुळे महिला व बाळाच्या अनेक समस्या वृध्दिगत होतांना दिसुन येत आहेत. मानसशास्त्रीय दृष्टीकोणतून व्यक्तीवाढ व विकासाच्या अंतर्भुत शैशवावस्थेमध्ये शारीरिक, मानसिक आणि समजिक विकासाच्या पायाचे बिजारोपन केले जाते. बालकांना योग्य वेळी विविध सेवांची पूर्तता केल्यास समाजातील दुर्बल व दुबळया मागास वर्गातील घटकांसाठी तरतूद केल्यास भारतात बालमृत्यु, शारीरिक अपंगत्व, कुपोषण इत्यादींचे प्रमाण कमी करता येईल, बालकांना शालेय पूर्व शिक्षण देणे, मानसिक क्षमतेचा विकास करणे इत्यादी बालकांना व मातांना, किशोरी इत्यादींसाठी विविध सेवा अविरत देण्यात येतात. त्यामुळे समुदायातील व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य करण्यात येईल. तसेच देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला निश्चितच सहकार्य लागेल. देशात सुदृढ व बालक भावी नागरिकांच्या प्रगतीच्या दृष्टीने हितकारक ठरेल इत्यादी हेतुने बालविकास सेवा योजना संघटित करण्यात आली.

**भारतातील महिलांचा विकास आणि सक्षमीकरण :–**

जगातिल अधिकांश सर्वच राष्ट्रात अनेक वर्षापासुन स्त्रियांचा दर्जा व महिलांचे स्थान उच्च श्रेणीतील असल्याचे आढळत नाही. त्यामुळे महिला घरात, घराबाहेर, समाजात, कामाच्या ठिकाणी तिचा दर्जा तसेच महिलांचे स्थान उंचावण्यासाठी प्रत्येक देशात, समाजात अनेक प्रकारची आदोलने, चळवळी कायदेशीर मार्गाने करण्यात येतात. महिलांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने अशाप्रकारच्या ज्या–ज्या, राज्यात, प्रदेशात, देशात प्रयत्न व आंदोलने करण्यात येत आहेत. त्या–त्या राज्यात, प्रदेशात देशामध्ये महिलांच्या

प्रश्नांना वाचा फुटत आहे. सर्वच देशात प्रश्नाचे, समस्यांचे निराकरण करण्याचे मार्ग वेगवेगळे असते. तरिही समस्यांचे, प्रश्नाचे स्वरूप एक आहे. अठरावे, एकोणीसावे आणि विसावे अशी तीन शतके मानवी इतिहासाला क्रांतीकारी वळण देणारी आहेत. तसेच लोकसंख्या वाढीचा स्फोट, कुटुंब नियोजन नियंत्रणाचा शोध, स्त्रि सुधारणा, स्त्रि मुक्तीसाठी झालेले आंदोलन तसेच तीन दशकात झालेली आंदोलने यांमुळे २१ व्या शतकात नवीन दिशा मिळाली. जगातिल महिलांसाठी व भारतातील महिलाच्या विकासासाठी, प्रगतीसाठी आणि व्यापक अर्थाने मुलीसाठी फायदेशीर ठरलेली आहे.

भारतातील व इतर देशातील महिलांचे जीवन जन्मापासुनच परावलंबी, कमकुवत व इतरांच्या हुकुमाच्या आधारे वरील आहे. महिलांना इतर कामात सर्वसाधारणपणे दुय्यम स्थान आहे. महिलांना घर काम करतांना श्रमाचे काम महिलांनी करावे. पुरूषप्रधान व्यवस्थेत व पितृसत्ताक कुटुंबसंस्थेत स्त्रिला एकाच वेळी अनेक प्रकारची भुमिका पार पाडावी लागते. तसेच जिवापाड कष्ट सहन करावे लागते. त्याचप्रमाणे महिलांना मानसिक, आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक अडचणींना सामोर जावे लागते. अशा कठिनप्रसंगी स्त्रिया हताश होण्याची शक्यता असते. तेव्हा महिलांनी, कुटुंबातील लोकांनी, नातेवाईक, सामाजीक संस्था, शासनसंस्था या सर्वांनी आधार देण्याचे कार्य करावे. एकंदरीत महिलांचा विकास साधायचा असेल तर स्त्रि—पुरूष या दोघांना समान अधिकार, पुरूषप्रधान व्यवस्थेला बाजुला ठेऊन व महिलांना मानाचे स्थान देणे महत्त्वाचे आहे.

महिला विकासाच्या दृष्टिने विचार केल्यास स्त्रियां व्यक्तीगत जिवनात काळानुरूप काही बदल दिसुन येत आहेत. महिलांच्या कतृत्वाला थोडीफार प्रतिष्ठा मिळत आहे. मुलींच्या शिक्षणासाठी पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण व नंतर महाविद्यालयानी शिक्षणासाठी द्वार संथगतीने उघडी होत आहेत. काही प्रमाणात मुलगा—मुलगी भेद नष्ट होतांना दिसुन येत आहे. पुरूषांची प्रेरणा, समाजसुधारकांचे कार्य व स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फोडणारे नेते इत्यादीमुळे स्त्रियांच्या विकासाचे कार्य दिसुन येत आहे. स्त्रि शिक्षणामुळे महिला सामाजीक कार्यात तसेच राजकारणात सहभागाची संधी मिळाली आहे. महिलाकरिता आरोग्याच्या दृष्टिने अनेक योजना कार्यन्वित असल्यामुळे आरोग्याच्या बाबतीत जाणीव—जागृती झालेली आहे. महिलांना वैद्यकिय शिक्षण व उच्च शिक्षणात संधी उपलब्ध झाल्यामुळे आरोग्याच्या प्रश्नाविषयी लेखन करून स्त्रियांच्या समस्या लेखनातुन आपले विचार मांडत आहेत. इ.स. १९७० सालापासुन साधारणत: महिलांच्या प्रश्नांविषयींची जाणीव होतांना दिसुन येते. विकासात्मक कार्यातुन महिलामध्ये जाणीव—जागृती झाली आहे.

भारतीय महिलांच्या अधिकार हक्काकरीता कायद्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. बाळंतपणाच्या हक्काच्या रजा, पाळणाघराची सोय, प्रसाधन गृह, आरोग्याच्या दृष्टिने, अन्याय अत्याचाराच्या दृष्टिने इत्यादी अनेक कायदे महिलांकरीता आहेत. महिलांच्या मांगण्यानुसार सुधारण घडून येत आहे. महिलांना कामाचा ठिकाणी सुरक्षितता देण्याचे कार्य प्रशासनाकडुन केल्या जात आहे. परंतु कुटुंबातर्गत होणारा शारीरिक व मानसिक छळ यांपासुन महिलांना आजही पूर्णपणे मुक्तता झालेली नाही. महिला, हया पुरूषांबरोबर उत्पादनाच्या कार्यात सहभागी होत आहेत. स्त्रिया घरात आणि घराबाहेर जे—जे कार्य करीत आहेत. त्या कार्याकरीता प्रतिष्ठा प्राप्त होतांना दिसुन येत आहे.

एकाविसाव्या शतकात भारतांत कुटुंब कल्याणासाठी कुटुंब नियोजन, समाजकल्याणासाठी सामाजीक उपक्रम, लोकसंख्या शिक्षण, लैगिक शिक्षण आणि कुटुंबांचे जिवन शिक्षण आवश्यक आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्येचा विचार केल्यास जिवनमानाचा दर्जा उंचावने महत्त्वाचे आहे. वरील उपक्रम शासनामार्फत महिलांच्या विकासाकरीता व सक्षमीकरणाकरीता राबविण्यात येत आहेत. काही प्रमाणात यश मिळत आहे. भारतातील बालमृत्युचे प्रमाण कमी करण्याकरिता आरोग्य विभागामार्फत कसोशिने प्रयत्न सुरू आहेत. समुदायासाठी समुपदेशनाचे कार्य सुरू आहे. त्यात किशोरवयातील प्रश्न विवाहाची समस्या, वैवाहिक व्यस्था/वेदना, लैंगिक प्रश्न, कुटुंबनियोजन, अंधत्व, मानसिक तसेच आरोग्य संवर्धन आरोग्य शिक्षण आणि लैंगीक शिक्षण इत्यादी करीता तज्ञ मार्गदर्शका व मानसोपचारतज्ञ यांचेकडून समुपदेशनाचे कार्य करण्यात येत आहे. यामुळे महिलाचा विकास व सक्षमीकरणाची वाटचाल दिसुन येत आहे.

महिलाच्या विकासाकरीता व सक्षमीकरण यांच्याकरीता समाजसुधारकाचे कार्य मुलभुत स्वरूपाचे आहे. त्यात महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती, हितवादी देशमुख, आगरकर, महर्षी कर्वे, राजर्षी शाहु महाराज, महर्षी वि.रा. शिंदे या सर्व स्त्रिवादी पुरूषाचे निर्धारपूर्वक प्रबोधन महत्वाचे आहे. मा. फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई फुले यांचे स्त्रिजागृती स्त्रिशिक्षण, स्त्रिविकास इत्यादी कार्यामुळे महिला हया चुल आणि मुल या कार्याच्या बाहेर येऊन समाजकार्यासाठी बाहेर आल्यात. सावित्रीबाई फुले त्या काळातील पहिल्या सबल, सक्षम कार्यकर्ती व नेत्या होऊन गेल्या आहेत. त्यांच्यामुळे स्त्रि

शिक्षाणाला वाचा फुटली आहे. आजच्या परिस्थितीमध्ये समाजविकासासाठी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात अनेक उपक्रम महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत आहेत. भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेच प्रज्ञासत्ताक शासन व्यवस्थेअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुशल नेतृत्वामुळे भारताची राज्यघटना तयार झाली. चार भागात हिंदु कोड बिल पास झाले. आणि भारतातील महिलांना वारसा, विवाह, दत्तक विधान व पालकत्वासंबंधी मौलीक हक्क, अधिकार प्राप्त झाले. यामुळे स्त्रि सबलीकरणाला सुरूवात झाली. आणि महिलाचा विकास व सक्षमीकरणाकरीता पहिले पाऊल ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२० च्या दशकापासुन सतत ३०—३५ वर्ष दलित महिलांत शिक्षण, कुटुंब नियोजन यासंबंधी वृत्तपत्रे, व्याख्याने, शैक्षणिक संस्थाव्दारी अविरत प्रबोधन, प्रशिक्षणाचे कार्य व जागृती केलेली होती. त्यामुळे स्वातंपूर्व काळापासुन महिला चळवळीकरीता प्रेरणा मिळालेली आहे.

भारतात सविधानानुसार महिलांना समान अधिकार दिलेला आहे. महिलांना सविधानामुळे मतदानाचा अधिकार मिळालेला आहे. परंतु त्यानुसार प्रशासन व राजनैतिक कार्यात सहभाग दिला जात नाही. भारतीय समाजव्यवस्थेत महिलांच्या विकासाकरीता प्रभावी अमलबजावणी केली जात नाही. महिलांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांप्रश्नांचे निराकरण योग्य पध्दतीने केले जात नाही. महिलांच्या सरंक्षणाकरीता कायद्याची निर्मीती केली आहे. परंतु पाहीजे त्या प्रमाणात अमलबजावणी होत नाही. एकविसाव्या शतकात महिलांच्या विकासाकरीता वेगवेगळी पाऊले उंचलण्यात येत आहेत. स्त्री पुरूष समानता यांची अमलबजावणी होतांना दिसुन येत आहे. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये महिलांना मानाचे स्थान काही प्रमाणात मिळत आहे. स्त्रि विकासामुळे समाजव्यवस्था स्थायी राहण्यास मदत होईल. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने योग्य पाऊल टाकण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला, पूढे जात आहेत. महिला हया फक्त कुटुंबापर्यंत मर्यादित न राहता, इतर कार्यात सक्षम होत आहेत. महिला प्रत्येक कार्यात आपल्या बहुपर्यायी भुमिका पार पाडतांना दिसुन येत आहेत. महिला हया प्रकर्षाने, चिकाटीने, धैर्याने सर्वच क्षेत्रात मोलाचे कार्य करतांना दिसुन येत आहेत. महिलांचा गौरवप्राप्त तसेच उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त उल्लेखनिय कार्यात मोलाचा वाटा आहेत. महिला हया मुलाचे पालन पोषनापासुन तर त्यांचे संपूर्ण जीवनामध्ये बदल घडविण्याचे कार्य महिलां मार्फत केले जाते. स्त्रि हि आपल्या कोमल स्वभावातुन संपूर्ण कुटुंबाचा सांभाळ करत आहे. वेळप्रसंगी स्त्रि कठीन प्रसंगाला सामोर जाऊन संपूर्ण कुटुंबाचे पालनपोषन करीत आहे. भारतीय महिलानी शिक्षणाच्या कार्यात प्रगती केल्यामुळे विकास व सक्षमीकरणाचा प्रवाहात पूढे येत आहेत. कुटुंबात सुसंवाद ठेवण्याचे कार्य महिलाकडुन केले जाते. शिक्षणाच्या प्रगतीमुळे महिला हया बालविवाह, जुन्या परंपरा, व प्रथा इत्यादी अनेक जुन्या प्रथांना बदल करण्याकरीता पूढे येत आहे. महिला हया सेना, पोलीस, प्रशासन, रेल्वे सेवा, हवाई सेवा, परिवहन सेवा इत्यादी अनेक सेवा प्रत्यक्ष कार्यरत आहेत.

आधुनिक समाजव्यवस्थेत महिलांच्या विकासा करीता महत्वपूर्ण निर्णय घेतले जात आहे. मुख्य प्रवाहामध्ये महिलांना स्थान दिले जात आहे. पत्रकारीत क्षेत्रात महिला मोठया प्रमाणात काम करीत आहेत. आदिवासी महिलांच्या जीवनात बदल घडवुन अणणे, व प्रगतीच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जात आहे. आदिवासी महिलांचा विकास व सक्षमकरण्याकरीता वेगवेगळया योजना राबविण्यात येत आहेत. काही अंशी यश प्राप्त होतांना दिसुन येते. महिलांच्या विकासाकरीता व सक्षमीकरणाकरीता राष्ट्रीय महिला विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. आतंराष्ट्रीय स्तरावरून सुध्दा महिलांच्या प्रगतिकरीता कार्य केले जात आहे. पंचायत राजक्षेत्रात महिलांचा सहभाग मोठया प्रमाणात आहे. पंचायत राज्य व्यवस्थेमुळे महिला विकास व सक्षमीकरणाच्या दिशेने योग्य पाऊल पूढे जात आहे. पंचायत राज्यव्यवस्थेमुळे महिलांना राजकारणात प्रवेश मिळत आहे. महिलांना जाणीव जागृतीमुळे त्यांना अधिकाराची जाणीव तळागाळातील महिलांपर्यंत पोहचवित आहेत. उदा. ग्रामीण भागात ग्रामसभेत सहभागी होणे व ग्रामीण समस्येकडे लक्ष देणे इत्यादी कार्यात मोठा सहभाग आहे. महिला आरंक्षण धोरणामुळे महिलांचे सक्षमीकरण होत आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टिने परिवर्तन घडुन येत आहे. स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार, कौटुंबिक हिंसा याकरीता कायदेविषयक सरंक्षणामुळे स्त्रियांचे रक्षण होत आहे. परंतु पाहीजे त्या प्रमाणात आजही यश आलेले नाही. कुपोषित समाजाची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. महिलांकरिता फक्त कायदे तयार करून होणार नाही तर त्यांवर न्यायव्यवस्थेनी योग्य अमलबजावणी करणे आवश्यक आहे. एकंदरीत महिलांच्या विकासाकरीता व सक्षमीकरणाकरीता विविध उपक्रम, कायदे, कार्यक्रम, प्रबोधन, चर्चासत्र, महिलांचे, प्रशिक्षिण आणि विविध सेवा, इत्यादी अनेक उपक्रमांमुळे कार्य करण्यात येत आहे. महिलांचा विकास व सक्षमीकरणाची वाटचाल सुरू झालेली आहे.

**निष्कर्ष :—**

1. ग्रामीण महिलांनी महिलांना आरोग्याची व पोषणासंबंधी सर्व सेवा मिळाल्यामुळे ग्रामीण महिलांच विकास व सक्षमीकरण काही प्रमाणात झाले आहे.
2. ग्रामीण महिलांनी महिलांना वैयक्तिक व कौटंबिक दृष्टिकोणातून सेवा मिळाल्यामुळे महिलांचा विकास काही प्रमाणात झाला आहे.
3. ग्रामीण महिलांनी महिलांच्या विकासाकरिता समाजकार्य दृष्टिकोणातून कार्यक्रमांचे अंमलबजावणी काही प्रमाणात केली आहे.
4. ग्रामीण महिलांनी ग्रामीण महिलांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत महिलांना कायदेशीर हक्काची जाणीव—जागृती काही प्रमाणात झाली.
5. ग्रामीण महिलांनी महिलांना बालविकासाचा अवस्था माहित आहेत.
6. ग्रामीण महिलांनी मुलांच्या प्राथमिक शिक्षणाविषयी जाणीव आणि जागृती आहे.
7. ग्रामीण महिलांनी महिलांना संपूर्ण सेवा एकत्रितपणे मिळत असल्यामुळे महिलांची वैचारिक व मानसिक दृष्टिने विकास व सक्षमीकरण काही प्रमाणात झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**


1. आपटे ज.स. व पृष्पा रोडे (२००८), भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पूणे.
2. भांडारकर पि. एल. (१९८७), सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर
3. पांगुळ—बाराहाते (२००९), भारतीय ग्रामीण समुदाय विकास, आर.बि. प्रकाशन, मानेवाडा रोड, नागपूर,
4. सारस्वत स्वप्निल (२००४), महिला विकास, एक परिदृश्य, नमन प्रकाशन, नई दिल्ली,
5. त्यागी सुरेन्द्र, पंचायत राज आणि ग्रामीण विकास, वंदना पब्लिकेशन, अंसारी रोड, दरीयांज, नवी दिल्ली